|| सा विद्या या विमुक्तये ||
Yuvak Vikas Mandal's
**Arts Commerce Science College Bhalavali (Dhartale)**
**Affiliated to University of Mumbai**
Tal.- Rajapur, Dist.- Ratnagiri.
Principal – 9922879978, Office – 9881574726.
Email- artscommercesciencecollagebhal@gmail.com
******************************************************************************************

Date - 25 June 2024

# सूचना

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद यांच्यामार्फत "युवास्पंदन" जिल्हास्तरीय फिरता चषक वक्तृत्व स्पर्धा २०२४ चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे विषय आणि इतर तपशील सोबत जोडलेल्या माहितीपत्रकामध्ये आहेत. जे विद्यार्थी या स्पर्धेमध्ये सहभागी होऊ इच्छितात त्या विद्यार्थ्यांनी दिनांक २९ जून 20२४ पर्यंत प्राध्यापक सविता घुगरे (९४०४४४९६१३) यांच्याशी संपर्क करून नाव नोंदणी करावी.

सोबत - माहितीपत्रक

वेबसाईट : www.abvp.org पाजकृत क्र. - S-४८५/१५४३-५७

# अखिल भारतीय विद्यार्थी परिषद

## दक्षिण रत्नागिरी जिल्हा

पत्ता : आजगांवकर वाडी, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, जयस्थंभ रत्नागिरी - ४१५६१२

प्रति,
मा. प्राचार्य,
भालावली कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
भालावली.

विषय : "युवास्पंदन" जिल्हास्तरीय फिरता चषक वक्तृत्व स्पर्धा २०२४ बाबत...

महोदय,

आपण अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेशी सुपरिचित आहातच अभाविप गेली ७६ वर्षे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात काम करणारी जगातील सर्वात मोठी विद्यार्थी संघटना आहे. विद्यार्थी परिषद विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास व्हावा यासाठी विविध कार्य करत असते.

९ जुलै राष्ट्रीय विद्यार्थी दिनाचे औचित्य साधून अभाविपद्वारे जिल्हास्तरीय "युवास्पंदन" वक्तृत्व स्पर्धा घेण्यात येणार आहे. ही स्पर्धा दोन टप्प्यात घेतली जाईल. प्रथम टप्पा तालुकास्तरीय व दुसरा टप्पा जिल्हास्तरीय असेल. यामध्ये वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालय असा एकच गट असेल. स्पर्धेसाठी प्रत्येकी ५० रु. शुल्क आकारले जाईल. सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल.

- वक्तृत्व स्पर्धेचे विषय खालीलप्रमाणे
  - १) लोककलांचा वारसा कोंकण
  - २) बदलती भारतीय जीवनपद्धती
  - ३) अहिल्याबाई होळकर: स्त्री शक्तीची मूर्ती
  - ४) वसुधैव कुटुंबकम
- वक्तृत्व स्पर्धेचे नियम व अन्य सूचना
  - विद्यार्थ्यांना वक्तृत्वासाठी कमीत कमी सहा आणि जास्तीत जास्त आठ मिनिटांचा वेळ देण्यात येईल.
  - तालुकास्तरीय स्पर्धेमधील विजेत्यांनाच जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभाग मिळेल.
  - विजेत्यांना पदके, सन्मानचिन्ह तसेच विजय गटाला फिरता चषक दिला जाईल.
  - तालुकास्तरीय स्पर्धा दि. १ व २ जुलै २०२४ रोजी घेण्यात येईल.

तरी आपल्या महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभागी होण्याचे आपण विद्यार्थ्यांना आवाहन करावे, हीच विनंती.

आपले,

Sampada
संपदा महाबळ
जिल्हा संयोजक

For,
तेजस खरे
स्पर्धा प्रमुख

(नोंदणीसाठी आणि अधिक माहितीसाठी संपर्क क्र. 8265026186)